# जलशक्ती अभियानाचा शुभारंभ 500 पेक्षा विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

(12 July 2019) कला वाणिज्य व विज्ञान  महाविद्यालय बोदवड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या एकत्रित पुढाकारातून प्राचार्य अरविंद चौधरी यांच्या मार्गदशनाखाली मा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या महत्वाकांक्षी जलशक्ती अभियान शुभारंभ महाविद्यालयाचे प्राचार्य अरविद चौधरी, उपप्राचार्य प्रा डी एस पाटील , रा से यो कार्यक्रम अधिकारी डॉ चेतन शर्मा, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा नरेंद्र जोशी, रा छा सेना अधिकारी डॉ मनोज निकाळजे  तसेच 500 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या सामूहिक शपथ घेऊन सपन्न झाला

आजपासून दररोज मी ,माझे परिवार सदस्य, मित्र मिळून प्रत्येकी किमान अर्धा लिटर पाणी बचत करीन व देशाच्या या अभियानात प्रामाणिकपणे कार्य करीत राहीन अशी शपथ डॉ निकाळजे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिली

या अभियानाचे  दि बोदवड सार्व. को-ऑप. एज्यु. सोसा. लि. बोदवड संस्थेचे चेअरमन मिठूलालजी अग्रवाल, संस्थेचे उपाध्यक्ष अजयजी जैन, सचिव विकासभाऊ कोटेचा, अँड. प्रकाशचंद सुराणा, व संचालक मंडळाने स्वागत केले आहे

या वेळी प्राचार्य अरविद चौधरी यांनी जागतिक व राष्ट्रीय स्तरावर जलव्यवस्थापन, संवर्धन तसेच पाणी बचतीचे मार्ग याबाबत उपस्थितांना मार्गदशन केले

या प्रसंगी प्रास्तविक प्रा. डॉ.  शरद काठोके यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. नरेंद्र जोशी यांनी तर आभार प्रसिद्धी प्रमुख डॉ रुपेश मोरे यांनी मानले

डॉ मधुकर खराटे, डॉ विनोद चौधरी, डॉ रत्ना जवरस, डॉ.  गीता पाटील, प्रा काचंन दमाडे, प्रा नितेश सावडेकर, डॉ पाठक डॉ अनिल बारी, डॉ महाले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी  उपस्थित होते











